**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक ०५.१२.२०२४**

# आंबिवली, कल्याण येथे पोलीस पथकावर हल्ला करणाऱ्या इराणी टोळीतील ४ आरोपी पोलीसांकडून जेरबंद

दिनांक.०४.१२.२०२४ रोजी रात्रौ २१.४० वाजताचे सुमारास एमआयडीसी पोलीस स्टेशन, मुंबई येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक पालवे व पथक व त्यांचे पथक हे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे ओनु लाला इराणी, वय २० वर्षे रा. आंबिवली, कल्याण यास ताब्यात घेण्यासाठी आंबिवली कल्याण येथे गेले होते. सदर आरोपीस ताब्यात घेवुन ते आंबिवली रेल्वे स्टेशन येथे आले असताना १५ ते २० अनोळखी इराणी महिला व पुरुष यांनी आपसात संगनमत करून व गैरकायदयाची मंडळी जमवुन पोलीसांच्या ताब्यात असलेला आरोपी ओनु लाला इराणी यास पोलीसांच्या ताब्यातुन सोडविण्याच्या उद्देशाने आंबिवली रेल्वे स्टेशन येथे जमुन सहाय्यक पोलीस निरीक्षक पालवे व त्यांच्या पोलीस पथकावर त्यांना कायदेशिर कर्तव्य करण्यापासून परावृत्त करण्याच्या व जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने दगडफेक करून गंभीर जखमी केले त्यामुळे सदर परीस्थितीचा फायदा घेवुन ओनु लाला इराणी हा आरोपी पळून गेला. आरोपींनी केलेल्या दगडफेकीमध्ये सपोनि/पालवे व पथक गंभीर जखमी झाले असुन रेल्वेच्या मालमत्तेचे देखिल नुकसान झाले आहे.

सदर घटने बाबत सर्व आरोपींविरुध्द खडकपाडा पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९(१), १३२, १२१(१), १८९(२)(३)(५), २६२, २६३, ३५२, ३५१(१), ३(५) सह रेल्वे ॲक्ट १९८९ चे कलम १४५, १४७, १५०, क्रिमीनल ॲमेंडमेंट कायदा कलम ७ प्रमाणे. जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्या बाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन, ४ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. तसेच उर्वरित पाहिजे आरोपींचा शोध व गुन्हयाचा पुढील तपास खडकपाडा पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर